**निशाणी क्रमांक – ११२.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – कमलाकर व्यंकटराव येणगे,

वय – ५६ वर्षे धंदा – शेती

रा. येणगेवाडी, ता.अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. हुडगे**

[फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २७३ अन्वये]

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.२ न्यायालयात हजर आहे. मी फिर्यादीस ओळखतो. घटना कधी घडली होती ते मला माहीत नाही. त्यांच्यात झालेल्या भांडणाबाबत मला माहीत नाही. पोलीस माझ्याकडे चौकशीला आले नव्हते त्यांनी माझे बयान घेतले नव्हते.

**साक्षीदार त्यांचे पूर्वीचे बयाणापासून परावृत्त झाल्यामुळे साक्षीदारास भा.सा.पु.कायद्याचे कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी विशेष सरकारी वकील यांनी मागितली, परवानगी देण्यांत आली...**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०७.०१.२०१९ रोजी आमच्या गल्लीमध्ये आमच्या घरासमोर ओरडण्याचा आवाज आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी त्र्यंबक चिमनदरे, बाबुराव कुंठे, पंढरी माकणे असे आम्ही आरोपीच्या घरासमोर एकत्र आलो तेव्हा फिर्यादी आरोपीच्या घरासमोर मोठमोठ्याने आरडाओरड करत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तिला घरात जायचे नाही, आरोपी तिला मारतात, तिला आईवडीलांकडे जायचे आहे असे म्हणून ओरडत होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वजण तिला रात्र झाली आहे घरात जा असे म्हणालो तरीही ती घरात जाण्यास तयार नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही तिला समजावून तिला तिच्या वडीलांना फोन लावून दिला. हे म्हणणे खरे

**निशाणी क्रमांक – ११२.**

नाही की, तिचे वडील रात्री वाहन नसल्याने येऊ शकणार नाही असे म्हणाले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी क्र.२ फिर्यादी घरात येत नाही, ते पैसे देतील असे म्हणून मला फिर्यादीला खाजगी वाहनाने सोडून येण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वजण खाजगी वाहनाने फिर्यादीला तिच्या आईवडीलांकडे सोडून आलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपी फिर्यादीस माहेरहून दहा लाख घेऊन ये असे म्हणून तीस त्रास देत असल्याने तिने केस केल्याचे कळाले. हे म्हणणे खरे नाही की, असे सर्व माझ्यासमक्ष घडल्याने मी पोलीसांना तसे जबाब देताना सांगितले होते.

**०३.** आता मला माझा जबाबातील अधोरेखित भाग वाचून दाखवण्यात आला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे नाही. तो तसा का नमूद आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखचे असल्याने त्यांना शिक्षा होऊ नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपी तर्फे उलट तपास श्री महालिंगे डी.पी. यांच्या मार्फत सुरू–</u>**

**०४.** नाकारला.

फेर तपास काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.09.18 17:39:32 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१८.०९.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.